**कृपया प्रसिद्धीसाठी** **24 मार्च 2014**

## भाजपा नेते व माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी सोमवार, 24 मार्च 2014 रोजी मुंबई येथे पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन

### *आचार संहिता भंगाच्या खोट्या तक्रारी बद्दल श्री.संजय निरुपम यांना निवडणूक अधिका-यांचा फटका : श्री.राम नाईक*

**मुंबई, सोमवार :** ''भारतीय जनता पार्टी विरुध्द आचार संहिता भंगाची खोटी तक्रारी करुन खासदार श्री.संजय निरुपम रडीचा डाव खेळत असल्याचे सिध्द झाले आहे. माझ्याविरुध्द अकारण खोटी तक्रार दाखल करुन तिचा वृत्तपत्रातून गवगवा करणारे श्री.संजय निरुपम आता ती तक्रार निवडणूक निर्णय अधिका-यांनी फेटाळल्यावर माझी माफी मागण्याचा प्रामाणिकपणा दाखवतील काय ?'', असा प्रश्न भाजपा नेते व माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केला. श्री.राम नाईक यांच्या विरुध्द काँग्रेसचे उत्तर मुंबईचे खासदार श्री.संजय निरुपम यांनी आचार संहिता भंगाची खोटी तक्रार दाखल करुन जी अकारण बदनामी केली त्याचा जाब यावेळी श्री.नाईक यांनी विचारला.

खासदार निधी संकल्पनेचे जनक म्हणून ओळखले जाणारे श्री.राम नाईक यांनी 7 मार्च रोजी एक पत्रकार परिषद घेऊन मुंबईतील काँग्रेस - राष्ट्रवादीच्या खासदारांनी त्यांना स्थानिक विकासासाठी मिळालेला निधी पूर्णतः वापरला नाही याचा गौप्यस्फोट केला होता. त्यावेळी मुंबईतील काँगेस - राष्ट्रवादीच्या सहा विद्यमान खासदारांनी त्यांना प्रत्येकी उपलब्ध असलेल्या रु. 19 कोटींपैकी केवळ रु. 11.85 कोटीच वापरले आहेत, उरलेले रु. 7.15 कोटी वेळेवर न वापरल्यामुळे मुंबईतील नागरिकांच्या विकासाचा मार्ग रोखला, असा आरोप श्री.नाईक यांनी केला होता. या आरोपामुळे आपले भांडे फुटल्याचे लक्षात आल्याने श्री.निरुपम यांनी रडीचा डाव खेळत 'चोराच्या उलट्या बोंबा' या म्हणीचा प्रत्यय आणून दिला. आपण सर्व निधी वापरला असून श्री.नाईक यांनी खोटा आरोप करुन निवडणूक आचार संहिता भंग केली आहे अशी तक्रार श्री.निरुपम यांनी 10 मार्च रोजी निवडणूक निर्णय अधिका-याकडे केली, एवढेच नाही तर श्री.नाईक यांनी आपली माफी मागावी अशी मागणीही केली होती.

पत्रकार असलेल्या खासदार श्री.संजय निरुपम यांनी शब्दांचा खोटा खेळ करण्याचा प्रयत्न केला. आपण रु. 20.78 कोटींचे प्रकल्प प्रस्तावित केले असून सर्व निधी वापरला आहे, तेव्हा श्री.राम नाईक यांनी माफी मागावी आणि मतदारांची दिशाभूल करुन आचार संहिता भंग केल्याने त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी श्री.निरुपम यांनी त्यांच्या तक्रारीत केली होती. याबाबत बोलताना श्री.नाईक म्हणाले, ''आजवरच्या माझ्या राजकीय कारकिर्दीत प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात असतानाही मी कधी कोणावर बिनबुडाचे आरोप केले नाहीत. खासदार निधी विनियोगाबाबत मला माहिती नाही अशी जर कोणाची समजूत असेल तर त्या व्यक्तीची कीव करावी तितकी थोडीच आहे. निधी प्रत्यक्ष वापरणे आणि निधीसाठी प्रस्ताव पाठविणे यात जमीन - अस्मानाचे अंतर असते. खासदाराला, तेही सरकारी पक्षाच्या खासदाराला आपल्या प्रस्तावांवर वेळेवर कारवाई करवून घेता येत नाही यावर कोण विश्वास ठेवेल ? श्री.निरुपम यांच्या तक्रारीबाबतच्या बातम्या वाचल्यानंतर मी स्वतःहून निवडणूक निर्णय अधिका-यांना माझे निवेदन तपासण्यासाठी दिले होते. श्री.निरुपम यांनाही पत्र लिहून माझे म्हणणे खरे असून मी माफी मागण्याचा प्रश्नच येत नाही असे सांगितले होते.''

निवडणूक निर्णय अधिका-यांनी श्री.निरुपम यांच्या तक्रारीबाबत तातडीने कारवाई केल्याबद्दल श्री.नाईक यांनी त्यांचे आभार मानले. निवडणूक निर्णय अधिका-यांनी श्री.राम नाईक यांच्या निवेदनाने आचार संहितेचा कोणताही भंग झाला नसल्याने त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे स्पष्टपणे श्री.निरुपम यांना कळविले आहे.''आता या निर्णयामुळे खोटी तक्रार केल्याबद्दल श्री.निरुपम माझी माफी मागण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतील का,'' असा प्रश्न श्री.नाईक यांनी केला आहे.

श्री.निरुपम यांनी मुंबई महापालिके द्वारा हाती घेतलेल्या कामांचेही खोटे श्रेय लाटण्यासाठी भूमिपूजन झालेल्या कामांचेही निवडणुका जाहीर झाल्यानंतर पुन्हा भूमिपूजन करण्याचा प्रयत्न केला. त्याची छायचित्र घेणा-या भाजपा नगरसेवक श्री.विनोद शेलार यांचा मोबाईल खेचून तोडला. याबद्दल भारतीय जनता पार्टीने तक्रार केल्यामुळे अडचणीत आलेल्या श्री.संजय निरुपम यांनी माझ्याविरुध्द खोटी तक्रार करुन मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला असला, तरी आता उत्तर मुंबईचे मतदार पुन्हा फसणार नाहीत, ते भाजपा - शिवसेना - रिपाई महायुतीचे उमेदवार श्री. गोपाळ शेट्टी यांच्या बाजूनेच कौल देतील,''असा विश्वास श्री.नाईक यांनी यावेळी व्यक्त केला.

**(कार्यालय सचिव)**

(1)


# निवडणूक निर्णय अधिकारी,२६ मुंबई उत्तर लोकसभा संघ यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, ७वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

दूरध्वनी क्रमांक २६४३५४५७, २६४३९९३४, २६४३५४८० (फॅक्स)

EMAIL ID-controllergreatermumbai@gmail.com


क्रमांक निनिअ/-२६ मुं.उ.लो.म.सं./आचार सहिता/काचि- ३३ /२०१४
दिनांक:- १८.३.२०१४

प्रति,
मा.श्री. राम नाईक
माजी केंद्रीय पेट्रोलियम मंत्री,
९,शिवस्मृती, ५१ जयप्रकाश नगर,
गोरेगाव (पुर्व) मुंबई-.४०० ०६३

**विषय** - खासदार श्री. संजय निरुपम यांनी आचार संहिता भंगाच्या केलेल्या दि.१०.३.२०१४ रोजीच्या तक्रारी बाबत.

**संदर्भ** - आपले दि.१८.३.२०१४ चे पत्र.

आपले उपरोक्त संदर्भाधीन अर्जान्वये खासदार श्री. संजय निरुपम यांनी या कार्यालयात दि. १०.३.२०१४ रोजीचे अर्जानुसार आपले विरुध्द आचार संहिता भंगाची तक्रार सादर केली असून , सादर केलेल्या तक्रारीची प्रत आपणास पाठवून दिलगिरी व्यक्त करण्याबाबत कळविले असल्याचे नमूद केले आहे. सदर तक्रारीबाबत आपण श्री. संजय निरुपम यांना दिलेल्या उत्तराची प्रत पाठविली आहे, व सदर प्रकरणी आपण योग्य ती कार्यवाही करण्याबाबत विनंती केली आहे.

खासदार श्री. संजय निरुपम यांनी केलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यात आली असून या कार्यालयाने दि.१३.३.२०१४ रोजी खासदार श्री. संजय निरुपम यांना कळविले आहे, सदर पत्राची प्रत आपले माहिती करीता सोबत पाठविण्यात येत आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी
२६-उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघ

श्री. राम नाईक
का जनसंपर्क कार्यालय-मुंबई
22 MAR 2014
Office of
Shri Ram Naik-Mumbai

②

# OFFICE OF THE RETURNING OFFICER, 26 MUMBAI NORTH PARTLIAMENTARY CONSTITUENCY.

Administrative Bldg., 7th Floor, Bandra (East), Mumbai 400 051
Tel. No. 26435457,26439934, 26435480Fax)
EMAIL ID- controllergreatermumbai@gmail.com

**No. RO/26MNPC/ELN/CODE-COND/WS74 /2014**
Date: 13.03.2014

**To,**

**Shri Sanjay Nirupam,**
Member of Parliament, Lok Sabha,
A/2, Parag Building, Reserve CHS Ltd.,
Chandavarkar Road, Borivali (West),
Mumbai 400092.

**Sub: Violation of Election Code of Conduct by Bhartiya Janata Party.**

**Ref: Your letter dated 10.3.2014**

I have received your letter on the above mentioned subject on 12.3.2014. On perusal of the contents of the letter it is seen that the press release by Office Secretary of Bhartiya Janata Party dated 7.3.2014 is about use of MPLAD funds. I have gone through your letter, exhibits with your letter and the guide lines issued by Election Commission of India regarding Model Code of Conduct. The accussation made in the said press release does not amount to breach of Model Code of Conduct. Hence the question of taking action for violation of Model Code of Conduct does not arise.

This is for your information.

(Dr.Avinash Bhakne)
Returning Officer,
26 Mumbai North Parliamentary Constituency.

Copy submitted to the Collector & District Election Officer, Mumbai Suburban District for favor of information.

Returning Officer,
26 Mumbai North Parliamentary Constituency.

निर्गमित 
13/3/14